# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078

Address-sp office Bidco Road,Palghar west

E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.५१ दिनांक २४/०६/२०२१

## अवैध्य रित्या रेती उत्खनन करणा-यावर केळवा सागरी पोलीसांकडुन कडक कारवाई

मा.श्री. दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. विकास नाईक, उप विभागीय पोलीस अधिकारी पालघर, यांनी केळवा सागरी पोलीस ठाणे हद्दीत वैतरणा ब्रीज ९३ व ९२ चे परिसरात रेती उत्खनन होत असल्याने रेल्वे ब्रीजला मोठा संभाव्य धोका निर्माण होत असुन वाढीव वैतीपाडा गाव हे चारही बाजुने समुद्र किना-याने वेढलेले असल्याने वाढीव वैतीपाडा गावचे किना-यावरील रेती उत्खननामुळे मोठा संभाव्य धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. त्याबाबत प्रतिबंधक उपाययोजना करण्यासाठी दिलेल्या मार्गदर्शक सुचनां व आदेशाप्रमाणे श्री सुनिल शिंदे मा.तसहसीलदार तथा दंडाधिकारी, पालघर, सपोनि/भीमसेन गायकवाड, प्रभारी अधिकारी केळवा सागरी पोलीस ठाणे, यांनी दिनांक २३/०६/२०२१ रोजी केळवा सागरी पोलीस ठाण्याचे हद्दीत वाढीव-वैतीपाडा येथे ठिक ठिकाणी वेषांतर केलेले पोलीस अंमलदार, व पोलीस मित्र यांना मार्गदर्शन करुन रेती अवैध्य रित्या रेती उत्खनन करुन स्वत:चे फायद्याकरीता रेती चोरी करुन बोटीने वाहुन नेवुन गुन्हे करणा-या आरोपीत क्र. १ रा. वाढीव  पो.नवघर व त्याचे ३ ते ४ साथीदार यांना पोलीसांनी थांबण्याचा इशारा दिला असता बोट मालक तसेच इतर साथीदार खाडी किना-या लगत झाडी झुडपात पळुन गेले. आरोपीत क्र. २ रा.वाढीव ता.जि.पालघर तसेच त्याचे इतर २ ते ३ साथीदार यांना देखील थांबण्याचा इशारा केला असता बोट सोडुन पळुन गेले. आरोपीत क्र. ३. रा.वाढीव ता.जि.पालघर व त्याचे ४ ते ५ साथीदार यांना रेतीची बोट भरुन जात असतांना थांबवले असता त्यांनी किना-यावर बोट घेवुन झाडी झुडुपात बोट सोडुन पळुन गेले. तसेच तहसीलदार पालघर यांचेसमवेत दारशेतपाडा,सोनावे भागात एक सेक्शन पंप व दोन रेतीने भरलेल्या बोटी असा मुद्देमाल असुन सदरच्या तिन्ही बोटीमध्ये एकुण <u>२०,४८,१७४/-</u> रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आला. सदर मुद्देमालातील रेती तहसीलदार तथा दंडधिकारी, पालघर यांचे समक्ष जागीच नाश करण्यात आलेली आहे.

सदर घटनेबाबत केळवा सागरी पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं.३१/२०२१, ३२/२०२१, ३३/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ३७९,१८८,३४, सह जमीन महसुन अधिनियम १९६६ चे कलम ४८(७),पर्यावरण अधिनियम १९८६ चे कलम १५ प्रमाणे दिनांक-२३/६/२०२१ रोजी दाखल केलेले आहेत. तसेच सदर कारवाई दरम्यान इतर २ बोटी रेतीने भरलेल्या व १ सेक्शन पंप बाबत सफाळा पोलीस ठाणे येथे ३८/२०२१, ३९/२०२१  भादंविस कलम ३७९, ३४ सह महाराष्ट्र जमीन महसूल संहीता १९६६ मधील कलम ४८(७), ४८(८) पर्यावरण अधिनियम १९८० चे कलम १५,१९ प्रमाणे गुन्हे दाखल केले आहेत.

सदरची कारवाई सपोनि/श्री.भीमसेन गायकवाड,प्रभारी अधिकारी केळवा सागरी पोलीस ठाणे, सपोनि संदिप कहाळे, प्रभारी अधिकारी सफाळे पोलीस ठाणे, सफौ/माळी, भोईर,पोलीस नाईक नवनाथ भगत,पोलीस कॉन्स्टेबल जयदीप सांबरे,सोमनाथ धनवट,संदिप खिल्लारे व पोलीस मित्र यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे यशस्वी झाली आहे.

Scanned with CamScanner